# बृहन्मुंबई महानगरपालिका

**लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई – 22**

क्र. लोटिरु /5240/ रुप्र

दिनांक: 15/06/2026

## <u>जाहिरात</u>

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/6647 दि.30.05.2025 नुसार, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता खालील नमूद करण्यात आलेली विविध पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. सदर पदाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Careers-All या संकेतस्थळावर प्रस्तुत जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/ पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जाचे शुल्क लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभाग (रुम. नं.15) येथे रुपये 870/- + 18% जीएसटी रु. 157/- = एकूण रु.1027/- इतके शुल्क दि. 15.06.2026 ते 24.06.2026 पर्यत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून, पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि.24/06/2026 रोजी संध्याकाळी 05.30 पर्यंत सादर करावा.

विविध पदांसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वतः खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता / अटींची पुर्तता करीत असून सदर कंत्राटी पदाकरीता ते पात्र आहेत. <u>उमेदवाराच्या अर्जात नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.</u>

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विविध पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

कंत्राट कालावधी : दि. 01.07.2026 ते 31.03.2027

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | न्युरोलॉजी तंत्रज्ञ (Neurology Technician) | 1 | रु. 20000/- | उमेदवाराने बी.पी.एम.टी. (Bachelor of Paramedical Technology-Neurology)महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोलॉजी विषयातील पूर्णवेळ 3 वर्षांचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा व त्याने 12 महिन्यांची इंटरशीप पुर्ण केलेली असावी. |
| 2 | श्रवणशास्त्रज्ञ व वाक उपचारतज्ञ (अंशकालिक) (Audio Cum Speech Therapist) | 1 | रु. 25000/- | वाक उपचार व श्रवण तंत्रज्ञ (Audio Cum Speech Therapist) यांचे शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठाची ऑडीओलॉजी आणि स्पीच थेरपी (Audiology and Speech Therapy) ही पदवी धारण करणारा असावा तसेच वाक श्रवण उपचार किंवा कर्णबधीर क्लिनिक मध्ये काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा. |
| 3 | डायलेसिस तंत्रज्ञ | 08 | रु. 20000/- | B.Sc. in Dialysis Technology from recognised university OR 12th passed with 1 year / 6 months certificate course in Dialysis Technology |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | प्रयोगशाळा सहाय्यक (Laboratory Assistant) | 12 | रु. 16000/- | 1)उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र (Chemistry) /सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology)/ जीवरसायनशास्त्र (Biochemistry) /जैविकतंत्रज्ञान (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc.) उत्तीर्ण असावा.<br>2) उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| 5 | ई.सी.जी. तंत्रज्ञ (E.C.G. Technician) | 1 | रु. 20000/- | 1) उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कॉर्डीयो टेक्नोलॉजी (Cardo Technology) विषयातील बी.पी.एम.टी.(Bachelor in paramedical Technology in Cardio-Technology) 3 1/2 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा. *किंवा*<br>2) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थविज्ञान (B.Sc in Physics) पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा व त्यास इ.जी.सी. मधील कामाचा 6 महिन्यांचा अनुभव असावा.<br>3) उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| 6 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Laboratory Technician) | 2 | रु. 20000/- | 1)उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBT)/डी.एम.एल.टी.(D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा (B.Sc.+ D.M.L.T.) *किंवा*<br>उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकीय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडीसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा. |
| 7 | औषध निर्माता (Pharmacist) | 1 | रु. 20000/- | 1)उमेदवाराकडे राज्यशासनाचा तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे. 2) उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा. |
| 8 | क्षकिरण- तंत्रज्ञ (x-Ray Technician) | 3 | रु. 20000/- | 1) उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्षकिरण- विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor of Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षांचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्यांची इंटरशीप पुर्ण केलेली असावी. (प्रथम प्राधान्य) *किंवा*<br>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. त्याचबरोबर मान्यताप्राप्त संस्थेकडून/विद्यापीठातून रेडीओग्रॉफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर/रुग्णालय येथील क्षकिरण- विषयक कामाचा 01 वर्षाचा अनुभव असावा. (व्दितीय प्राधान्य) *किंवा*<br>उमेदवार हा विज्ञान शाखेतील 12 वी किंवा 12 वी (MCVC) नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून/विद्यापीठातून रेडीओग्रॉफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर/रुग्णालय येथील क्षकिरण- विषयक कामाचा 02 वर्षाचा अनुभव असावा. (तृतीय प्राधान्य)<br>2) उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |

तसेच वरिल अनु क्र. 01 ते 05 मधील उमेदवारांनी खालील अर्हता धारण करणे गरजेचे आहे.

1) (उमेदवार किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन) माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2) उमेदवार 'डीओईएसीसी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जीईसीटीचे' प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तीने 'एम.एस.सी.आय.टी.' ही परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा**: उमेदवाराचे वय 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती:**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीमधून प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
2. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ : अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या email वर दोन दिवस आधी कळविण्यात येईल.
3. अर्ज करण्याचा कालावधी :

   दि. 15.06.2026 ते 24.06.2026
4. अर्जाचे शुल्क :

   रुपये 870/- + 18% जीएसटी रु. 157 /- = एकूण रु.1027/-

   सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
5. **सर्वसाधारण अटी:**
   - उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पुर्ण असावा.
   - पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून प्राप्त झालेले उमेदवाराचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करावे.
   - उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
   - उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
   - निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
   - कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

- उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 90 दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
- नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु. 500/- बाँड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
- उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
- त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
- नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपामध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
- कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, लोटिमस रुग्णालय यांच्याकडे राहील.
- ते दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
- सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रदद करण्यांत येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, लोटिमस रुग्णालय यांना आहेत.
- लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई – 22 येथे रुग्णालयात कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.

**विशेषसुचना :**

अ) दि.19.06.2026 नंतर संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

इ) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सोबत – अर्जाचा नमुना

सही/12.06.2026
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय,शीव,
मुंबई – 400 022.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. – 02224066381-89/ 022 28541017-18.

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव:

प्रति,

अधिष्ठाता,

लो.टी.म. स.वैद्यकीय महाविद्यालय व

सर्वसाधारण रूग्णालय, शीव,

मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म.स. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये ______________ पदाकरिता दिनांक ______________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) : ____________________________________________

2) पत्ता (कायमचा) : ____________________________________________

____________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) ____________________________________________

4) पदाचे नाव ____________________________

5) जन्म दिनांक: ____________________________

6) वजन: ________________ किलो उंची: ________________ सें.मी.

7) वय:____________________________

8) शैक्षणिक अर्हता: ____________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती

दिनांक

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

____________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव:

_________________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) : _____________________________________

4) पत्ता : _________________________________________________________________

_________________________________________________________________________

5) दूरध्वनी

क्रमांक:_____________________________________________________________

6) इ – मेल आय डी :

____________________________________________________________

7) लिंग– पुरुष _______________स्त्री ____________________

8) जन्मदिनांक: दिनांक_________ महिना_________ वर्ष __________

दिनांक ___________________ रोजी असलेले वय _________ महिने ________

दिवस____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव: ________________________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता:

__________________________________________

_________________________________________________________________________

12) उंची: ___ फूट __ इंच, वजन: _____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ वर्ण: ________ नेत्र वर्ण: ________ वैयक्तिक खूण: ________________

13) संगणकविषयक ज्ञान: M S-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील:

_____________________________________________

________________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली होय / नाही असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: